Regd. Post
RTI Matter

**F.No.3-2/2008-Sch.3**
**Government of India**
**Ministry of Human Resource Development**
**Department of School Education and Literacy**
**(Sch. 3 Section)**

..__.__..

**517, B Wing, Shastri Bhavan**
**New Delhi, Dated the 17th July, 2008.**

To,

Shri Deepak Kanere
A/4, Madhugiri Apartments, 408
V.N. Purav Marg
Chembur,
Mumbai-400071

Subject: Information under RTI Act.-regarding.

Sir,

Please refer to your application dated 06.07.08 received through Shri P.K. Mohanty (DEA), former CPIO in respect of matters relating to CISCE on 15.07.08, filed under RTI Act regarding Council for the Indian School Certificate Examination (CISCE). In this connection, it is stated that for obtaining the information, you have sent Indian Postal Order of Rs.10/- addressed to the Central Public Information Officer, D/o School Education & Literacy, whereas under the rules, a request for obtaining the information under the sub-section (1) of Section 6 should accompany with an application fee of rupees ten by way of cash against proper receipt or by demand draft or bankers cheque payable to the Accounts Officer of the public authority. In the case of Ministry of Human Resource Development the same should be in name of Pay and Accounts Officer, Ministry of Human Resource Development, payable at New Delhi 110015. The Postal Order alongwith your application, in original are being returned herewith with a request to remit the requisite fee.

2. However, your application has been treated as an ordinary application and para-wise reply to the information sought by you is as under:-

(i) CISCE is a Society registered under the Societies Registration Act XXI of 1860, which conducts public examinations and is not an autonomous organisation of this Ministry. As per communication no. 10/25/2006-IR dated 31.08.07 of Department of Personnel and Training, CISCE is not a Public Authority under the RTI Act, 2005 (copy enclosed).

(ii) The Central Government has not given any authority/permission to the CISCE to grant affiliations to educational institutions.The COUNCIL was established in 1958 by the University of Cambridge Local Examinations Syndicate with the assistance of the Inter-State Board for Anglo-Indian Education to ensure that its examinations become adapted to the educational needs of the country and assign the ultimate control of the same on the COUNCIL. The COUNCIL was registered as a Society under the Societies Registration Act XXI of 1860 of 19th December, 1967.

Contd./.....

The Council has been constituted to secure suitable representation of governments responsible for schools (which are affiliated to it) in their states/territories; the Inter–State Board for Anglo–Indian Education; the Association of Indian Universities; the Association of Head of Anglo–Indian Schools, the Indian Public School Conference; the Association of Schools for the ISC Examination and eminent educationists.

(iii) The Examinations have be designed to provide an examination in a course of general education, in accordance with the recommendations of the New Education Policy 1986, through the medium of English.

(iv) In so far as change of Affiliation rules is concerned, if published in newspaper article, is a matter of record, hence, the matter may be taken up with the CISCE and as far as providing of copies of guidelines for affiliation, since its inception is concerned, are not kept in the Ministry as the subject matter of affiliation is solely dealt with by the Council. You may formally request, CISCE to provide the same.

(v) In so far as record relating to enquiry against former Chief Executive and Secretary of CISCE is concerned, it is a matter of record, as in the newspaper article the Executive Committee of the Council has stated the details, as per the newspaper cutting. Therefore, CISCE being the custodian of information would be able to provide the information. Therefore, you may take up the matter with the Council for providing the charges raised by the Govt. and enquiry report.

3. CISCE has been requested to furnish the information directly to you within the stipulated time period (copy enclosed).

Encl: As above.

Yours sincerely,

(G.L. Jambulkar)
CPIO/Deputy Educational Adviser

अशासकीय विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून विलंब शुल्क आकारण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
परिपत्रक, क्र. एसएसएन २२०१/[३४१/२००१]माशि-३.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक ४ मे २००२

आवक दिनांक 20 JUN 2002
आवक क्रमांक ६६७४

संदर्भ :- १] महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन्स [प्रोव्हीबिशन ऑफ कॅपिटेशन फी] ॲक्ट १९८७
२] शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन १९९७/३११/९७/माशि-३, दि. २२ जुलै १९९९.
३] शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग, क्र. एसएसएन २००१/१२०/२००१माशि-३, दि. २२ जून २००१.
४] विभागीय शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई विभाग, यांचे पत्र क्र. शिउसं/माध्य-४/२७१०, दि. २२ नोव्हेंबर २००१.

शासन परिपत्रक :-

अशासकिय विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील काही विद्यार्थ्यांच्या पालकांकडून ब-याचवेळा विलंबाने शैक्षणिक शुल्क अदा केले जाते. त्यामुळे शिक्षकांचे वेतन व भत्त्यांची अदाई करणे व शाळांना अन्य खर्च भागविणे यासाठी शाळांना अडचणी येत आहेत. शैक्षणिक शुल्क विलंबाने अदा करण्याच्या कृतिस आळा घालणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे काही शाळांकडून मनमानी दराने विलंब शुल्क आकारले जाते. विलंब शुल्क आकारण्यामध्ये सुसूत्रता असावी या दृष्टीकोनातून महाराष्ट्र ॲन्टी कॅपिटेशन फी ॲक्ट १९८७ मधील कलम ४.३ [आय] मधील तरतुदींच्या अनुषंगाने शासन खालील अटींच्या अधीन राहून विलंब शुल्क आकरण्यास परवानगी देत आहे :-

कार्यबल गटाने मान्य केलेले शैक्षणिक शुल्क, सत्र पध्दतीने या मासिक वा वार्षिक तत्वावर आकारलेले कोणतेही शुल्क विहित केलेल्या दिनांकापूर्वी विद्यार्थ्यांने भरणे आवश्यक राहील. जर या विहित दिनांकानंतरही १० दिवसापर्यंत संबंधित विद्यार्थ्याने शुल्क अदा केले नाही तर, त्यानंतर जेव्हा ते शुल्क शाळेकडे जमा करण्यात येईल त्या कालावधीसाठी प्रत्येक दिवशी रुपये १/- याप्रमाणे विलंब शुल्क संस्थेला आकारता येईल. संबंधील विद्यार्थी विलंब शुल्क क्षमापित करण्यासाठी शाळा व्यवस्थापनाकडे विनंती अर्ज करु शकेल व शाळा व्यवस्थापन आपल्या स्तरावर त्याचा योग्य तो निर्णय घेईल. विलंब शुल्कापोटी जमा करण्यात आलेली रक्कम शाळेच्या विकास निधीमध्ये जमा करण्यात यावी प्रत्येक शाळेने शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी विहित केलेला दिनांक शिक्षणाधिकारी / शिक्षण निरीक्षक व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना कळवावा त्याचप्रमाणे प्रत्येक शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी सदर बाब पालकांच्या नजरेस आणून द्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सहि

क्र. शिनि/उ/आस्था/फी/ 5284
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई, उत्तर विभाग
यांचे कार्यालय, चेंबूर, मुंबई - ७१.

दिनांक: 12 JUN 2002

उपरोक्त शासन परिपत्रकानुसार कार्यवाहीसाठी अग्रेषित.

शिक्षण निरीक्षक
बृहन्मुंबई, उत्तर विभाग

प्रति,

मुख्याध्यापक,

मान्यताप्राप्त अशासकिय विनाअनुदानित माध्यमिक शाळा
उत्तर विभाग.

प्रत: -

१] मा. शिक्षण उपसंचालक बृहन्मुंबई
यांना सविनय सादर

२]. संबंधीत शिक्षण उपनिरीक्षक
एफ / साऊथ /एफ/ नॉर्थ, एल्. एम्. एन्. टी. वार्ड.

यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रति,
मुख्याध्यापक,
माध्यमिक/उच्चमाध्यमिक

विषय :- अशासकिय विनाअनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून विलंब शुल्क आकारण्याबाबत.

संदर्भ :- जा. क्र.ठाजिप/शिक्षण /का.क्र. ९ /५२२ माध्यमिक शिक्षण विभाग जि.प. ठाणे दि. १०. ०६. २००२.

अशासकिय विनाअनुदानित प्राथमिक माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळांमधील काही विद्यार्थ्यांच्या पालकांकडून बऱ्याचवेळा विलंबाने शैक्षणिक शुल्क अदा केले जाते. त्यामुळे शिक्षकांचे वेतन व भत्त्याची अदाई करणे व शाळांच्या अन्य खर्च भागविण्यासाठी या शाळांना अडचणी येत आहेत. शैक्षणिक शुल्क विलंबाने अदा करण्याच्या कृतिस आळा घालणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे काही शाळांकडून मनमानी दराने विलंब शुल्क आकारले जाते. विलंबशुल्क आकरण्यामध्ये सुसूत्रता असावी या दृष्टीने महाराष्ट्र ॲन्टी कॅपिटेशन फी ॲक्ट १९८७ मधील कलम ४-३ [आय] मधील तरतुदीच्या अनुषंगाने शासन खालील अटींच्या आधीन राहून विलंब शुल्क आकरण्यास परवानगी देत आहे.

कार्यबल गटाने मान्य केलेले शैक्षणिक शुल्क, सत्र पध्दतीने वा मासिक वा वार्षिक तत्वार आकारलेले कोणतेही शुल्क विहीत केलेल्या दिनांकापूर्वी विद्यार्थ्याने भरणे आवश्यक राहील. जर या विहीत दिनांकानंतरही १० दिवसांपर्यंत संबंधित विद्यार्थ्याने शुल्क अदा केले नाहीतर, त्यानंतर जेव्हा ते शुल्क शाळेकडे जमा करण्यात येईल त्या कालावधीसाठी प्रत्येक दिवशी रू.१/- प्रमाणे विलंब शुल्क संस्थेला आकारता येईल संबंधित विद्यार्थी विलंब शुल्क क्षमापित करण्यासाठी शाळाव्यवस्थापनाकडे विनंती अर्ज करू शकेल व शाळा व्यवस्थापन आपल्या स्तरावर त्याचा योग्य तो निर्णय घेईल. विलंब शुल्कापोटी जमा करण्यात आलेली रक्कम शाळेच्या विकासनिधीमध्ये जमा करण्यात यावी प्रत्येक शाळेने शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी विहीत केलेल्या दिनांक संबंधित शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक व विभागीय शिक्षण उपसंचालक, यांना कळवावा. त्याच प्रमाणे प्रत्येक शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी सदरबाब पालकांच्या नजरेस आणून द्यावी.

गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, डहाणू.

नंबर बाहेर/शिक्षण/बाहेर/ ९६०
पंचायत समिती कार्यालय
डहाणू तारीख १२/८/०२

विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयांची पत्त्यासह यादी.

१ विभागीय शिक्षण उपसंचालक,
लाल देवळासमोर, १७, डॉ.आंबेडकर रोड,
पुणे विभाग, पुणे- ४११ ००१.

२ विभागीय शिक्षण उपसंचालक,
नेताजी सुभाषचंद्र बोस रोड,
जवाहर बालभवन, चर्नीरोड,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई- ४०० ००४.

३ विभागीय शिक्षण उपसंचालक,
हत्ती महल, शिवाजी रोड,
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.

४ विभागीय शिक्षण उपसंचालक,
नाशिक रोड,
नाशिक विभाग, जिल्हा नाशिक.

५ विभागीय शिक्षण उपसंचालक,
देवगिरी कॉलेज जवळ, अदालत रोड,
औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.

६ विभागीय शिक्षण उपसंचालक,
लातूर विभाग,
लातूर.

७ विभागीय शिक्षण उपसंचालक,
टी पॉईंटजवळ, जुने मॉरिस कॉलेज,
नागपूर विभाग, नागपूर.

८ विभागीय शिक्षण उपसंचालक,
वलगाव रोड,
अमरावती विभाग,अमरावती.

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## शिक्षण विभाग
## खाजगी प्राथमिक शाळा

क्रमांक एसएएस/३४ दिनांक २४ मे २००६

शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय,
हिंदु कॉलनी, दादर (पूर्व),
मुंबई- ४०० ०१४.

प्रति,
श्री. जयंत बी.जैन
फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन
१४-ए, डॉ. एम.सी.जावळे रोड,
दादर डिपार्टमेंटल स्टोअर्सजवळ,
दादर (पश्चिम),
मुंबइ-४०० ०२८.

विषय :- नर्सरी, ज्युनियर के.जी. व सिनियर के.जी.
यांना शासनाने किंवा शिक्षण विभागाने मान्यता
दिली आहे किंवा नाही याबाबत.

संदर्भ :- माहितीच्या अधिकारांतर्गतचे आपले दिनांक
३१.३.०६ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यात येते की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून इयत्ता १ ली ते ४ थी च्या प्राथमिक वर्गांना मान्यता देण्यात येते. नर्सरी, ज्युनियर के.जी. व सिनियर के.जी. यांना महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून मान्यता देण्यात येत नाही अथवा त्यांची शिक्षण विभागाकडून नोंदणी करण्यात येत नाही. सदर बाब, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या कार्यकक्षेत येत नसल्यामुळे संदर्भित पत्रात आपणास आवश्यक असलेली अनु.क्र.३ येथील ए, बी, सी, डी, ई, एफ व जी येथील माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागास देता येत नाही.

शिक्षणाधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका

जाक्र. शिनिपविमुं/माउ/आरपु/०६/ ८६६५
शिक्षण निरीक्षक,[पश्चिम] बृहन्मुंबई
जोगेश्वरी,[पू.] मुंबई - ६०
दिनांक - ९.५.०६

प्रति,
श्री. जयंत बी. जैन
फोरम फॉर फेअरनेस इन एज्यु.
१४ ए, डॉ. एम. सी. जावळेरोड,
दादर डिपार्टमेंट स्टोअर्स,
दादर [प.] मुंबई २८.

विषय - माहितीच्या अधिकाराअंतर्गत अधिनियम-२००५ शासन मान्य अनुदानित/विनाअनुदानित/अल्पसंख्यांक शाळांना पूर्व प्राथमिक विभाग जोडणेबाबत.

संदर्भ - श्री. जयंत जैन, फोरम फॉर फेअरनेस इन एज्यु. यांचा अर्ज दि. २९. ३२००६

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये मागविण्यात आलेली मुद्देनिहाय माहिती/अभिप्राय खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

१] वरील विषयाला अनुसरुन माहितीचा अधिकार माहिती हवी असलेल्या मुद्दा क्र. ३ याच्यात विचारलेली माहिती सुसंगत नाही. तरी मुद्दा क्र. ३ वर विचारलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

३-[१] शासन निर्णय क्र. एसएसएन २१०३/५७/०३]/माशि-२, दि. २७.५.०३ मधील मुद्दा क्र. ३ शैक्षणिक शुल्क - क,ख,ग,घ अन्वये फी जमा करणे, फी वाढविणे फी चे दर ठरविणे हे सर्व शाळेच्या व्यवस्थापनाकडे सुपूर्त करण्यात आलेले आहेत. तसेच या बाबत शिक्षक-पालक संघ यांच्या सभेत शैक्षणिक शुल्क सत्र शुल्क, संगणक शुल्क या व्यतिरिक्तच्या बाबत निश्चिती करुन घेण्यात यावी.

३-[२] १९८७ ते २००३ या कालावधीत आकारलेल्या शैक्षणिक शुल्कासाठी शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून व्यवस्थापनाने मान्यता घेणे बंधनकारक होणे व त्यानुसार जर एखाद्या शाळेची तक्रार असेल तर त्यानुसार चौकशी केली जात असे.

३-[३] मधील नमूद केलेल्या कोणत्याही प्रकारच्या शुल्कासाठी या कार्यालयाकडून परवानगी दिली जात नाही.

२] एकाही शाळेला वरील मुद्द्यात नोंद केलेल्या शुल्काबाबत या कार्यालयाने परवानगी दिलेली नाही.

३] सी मध्ये नमूद केलेला मुद्दा या कार्यालयाच्या कक्षेत येत नाही.

४] शासन निर्णय दि. २७ मे २००३ नुसार सदरचे अधिकार पी. टी. ए. ला आहेत.

[..२ वर]

पालक शिक्षक संघ हा अशा प्रकारच्या शुल्क फी मान्यतेसाठी सक्षम समिती आहे.

५) अशा प्रकारची फी पालक नाकारू शकत नाही. परंतु जमा झालेल्या फी चा योग्य विनियोग शाळेत झाला नाही व अवास्तव शुल्क घेतली गेली तर पालक शिक्षण विभागाकडे दाद मागू शकतो.

६) तक्रार प्राप्त झाल्यास कार्यालयातर्फे १५ दिवसाच्या आत तक्रारीचा निपटारा करण्याचा प्रयत्न केला जातो.

९/५/०८.

शिक्षण निरीक्षक,[पश्चिम]
बृहन्मुंबई. की(न).

रजिस्टर ए.डी.

क्रशिनि/दवि/आस्था/ 3507-08
शिक्षण निरीक्षक,बृहन्मुंबई,
दक्षिण विभाग यांचे कार्यालय,
टोपीवाला लेन म्युनि.सें.स्कूल इमारत,
ग्रॅन्ट रोड, मुंबई—४०००07
दिनांक :— 26 MAY 2006

प्रति,
श्री जयंत बी.जैन,
फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन,
१४ अे,डॉ.अेम.सी.जावळे रोड,
दादर डिपार्टमेंटल स्टोअर जवळ,
दादर, (प) मुंबई—२८

विषय :— प्रीप्रायमरी विभागातील नर्सरी/ज्युनियर के.जी./सिनियर के.जी./या वर्गांना शासनाची अथवा अन्य शिक्षण खात्याची/विभागाची मान्यता असते किंवा नाही याबाबत व इतर बाबीसंबधी

संदर्भ:— १) आपला मा.शिक्षण उपसंचालक मुंबई विभाग यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतचा दिनांक २९.३.२००६ चा अर्ज
२) मा.शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांचे पत्र क्रशिउसं/प्राथ—१/८१८४—२१०, दिनांक २०.४.२००६

महोदय,

वरील विषयाबाबचा आपला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेला दिनांक २९.३.२००६ चा अर्ज मा.शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांचेकडे संदर्भिय पत्र दिनांक २०.४.२००६ सोबत प्राप्त झालेला आहे. सदरहू अर्जात आपण उपस्थित केलेल्या १ ते ३ मुद्यांची माहिती पुढील प्रमाणे देण्यात येत आहे.

मुद्याक्र. १ ) प्रिप्रायमरी विभागातील नर्सरी/ज्युनियर के.जी/सिनियर के.जी. या कार्यालयाच्या अधिकक्षेत नाही.

प्राप्त माहितीनुसार या वर्गांना शासनाची मान्यता देण्यात येत नाही.

मुद्याक्र. २ ) ———— वरील प्रमाणे ————

मुद्याक्र. ३ ) (अें) — पूर्वप्राथमिक वर्ग या कार्यालयाच्या अधिकक्षेत येत नाही.

(बी) ———— वरील प्रमाणे ————

(सी) ———— वरील प्रमाणे ————

( डी ) ———— वरील प्रमाणे ————

( ई ) ———— वरील प्रमाणे ————

( जी ) ———— वरील प्रमाणे ————

आपली विश्वासु,

शिक्षण निरीक्षक,
बृहन्मुंबई,दक्षिण विभाग

प्रत— मा.शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग मुंबई

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## शिक्षण विभाग
## खाजगी प्राथमिक शाळा

क्रमांक एसएएस/६० दिनांक २४ मे २००६

शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय,
हिंदु कॉलनी, दादर (पूर्व),
मुंबई- ४०० ०१४.

प्रति,
श्री. जयंत बी.जैन
फोरम फॉर फेअरनेस इन एज्युकेशन
१४-ए, डॉ. एम.सी.जावळे रोड,
दादर डिपार्टमेंटल स्टोअर्सजवळ,
दादर (पश्चिम),
मुंबई-४०० ०२८.

विषय :- इयत्ता १ ली च्या प्रवेशाकरीता असणा-या निकषांबाबत.
संदर्भ :- माहितीच्या अधिकारांतर्गतचे आपले दिनांक ३१.३.०६ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे :-

प्राथमिक शाळांमधून विद्यार्थ्यांच्या प्रवेश पध्दतीबाबत शासनाने खालीलप्रमाणे आदेश, शासन निर्णय क्र. पीआरई/२००३ (३५२६)/प्राशि-१ दिनांक २८.५.२००३ अन्वये निर्गमित केले आहेत :-

मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांनी प्रवेश देताना शाळेचा परिसर निश्चित करुन त्या परिसरातील विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणा-या अर्जापैकी एकूण प्रवेश क्षमतेच्या ८०% जागावर प्रवेश द्यावा. एकूण क्षमतेच्या उर्वरीत २०% जागांतील मुलांना प्रवेश देण्याबाबत संस्थांनी स्वेच्छा निर्णयानुसार प्रवेश द्यावा.

संस्थेने निश्चित केलेल्या परिसरातून उपलब्ध असलेल्या जागांपेक्षा अधिक अर्ज आल्यास संस्थेने योग्य ती पारदर्शक प्रवेश पध्दती वापरुन मुलांना प्रवेश द्यावा.

अपंग विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळेतून प्रवेश मिळावा या हेतूने उपरोक्त शाळांतील ३% जागांवर अपंग विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यात यावा.

शिक्षणाधिकारी

रजिस्टर एडी.

क्र. शिउसं/मावि-४/ 23595-96
शिक्षण उपसंचालक, बृहन्मुंबई यांचे
कार्यालय, जवाहर बालभवन
चर्नी रोड, मुंबई-४

दिनांक :- 1 AUG 2002

प्रति,

सचिव
दादर पारसी यूथ असेंब्ली हाय.
फीरोजशी रोड, एम.जे.कॉलनी
दादर, मुंबई-४०० ०१४

विषय :- दादर पारसी यूथ असेंब्ली हायस्कूल
या शाळेतील अनधिकृत फी बाबत.

आपल्या संस्थेच्या दादर पारसी यूथ असेंब्ली हायस्कूल, दादर या शाळेतील अनधिकृत फी बाबत श्री. जयंत जैन यांनी शासनाकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी समिती नियुक्त करुन तक्रारीतील मुद्यांची तपासणी करुन चौकशी समितीने आपला अहवाल या कार्यालयास सादर केला. या अहवालावर निर्णय देण्यापूर्वी दोन्ही पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची समक्ष संधी देण्यात आली. व सर्व बाबींचा विचार करुन पुढील प्रमाणे मुद्दे निहाय निर्णय देण्यात येत आहे.

मुद्दा क्रमांक १ - प्रवेश फी - या बाबत चौकशी समितीने शाळेच्या सर्व कागदपत्रांची पडताळणी केली असता कोणताही लेखी पुरावा आढळून आलेला नाही. तक्रारदार श्री.जैन यांनाही काही म्हणावयाचे नाही. शिक्षण निरीक्षक यांनी पुन्हा केलेल्या पडताळणीमध्ये शाळा फक्त नवीन प्रवेशाचे वेळेस प्रवेश फी घेत असल्याचे दिसून आले. या मुद्यामध्ये काही तथ्य नसल्याचे दिसून आले.

मुद्दा क्रमांक २ - शैक्षणिक शुल्क आकारणी :- शाळा दरमहा रुपये ३१५/- प्रमाणे शैक्षणिक शुल्क आकारत असून ते कार्यकारी मंडळाने दिलेल्या मंजुरी-नुसार असल्याने शाळा नियमानुसार शैक्षणिक शुल्क आकारत आहे.

मुद्दा क्रमांक ३ - संगणक फी - संगणक फी बाबत शिक्षण निरीक्षक यांना पुन्हा पडताळणी करण्याच्या सूचना सुनावणीच्या वेळी दिल्या होत्या त्यांनी दिलेल्या अहवालानुसार शालेय इयत्ता ५वी पासून संगणक शिक्षण असून ते सक्तीचे नाही तसेच गेल्या तीन वर्षात याबाबत कोणाचीही तक्रार प्राप्त झालेली नाही. संगणक हा विषय वैकल्पिक असल्याने संगणक फी परत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

....२